नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१५ Issue - 315 | वार सोमवार दि. ६ एप्रिल २०२६ Blow- Monday Date 6 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात ईडीची एन्ट्री

### कुणालाही सोडणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात आता ईडीकडूनही कारवाई होणार असल्याची माहिती स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच अशोक खरात याच्या गैरकृत्यात सहभागी झालेल्या कुणालाही सोडणार नाही, असं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे. अशोक खरातचे जे वेगवेगळे प्रकारचे ट्रान्झेक्शन आहेत ते आम्ही शोधून काढत आहोत. अशोक खरातची संपूर्ण संपत्ती, त्याचे सर्व गैरव्यवहार आणि त्यांनी महिलांवर ज्याप्रकारे गैरवर्तन केलं आहे त्या सर्व प्रकरणांची खोलवर चौकशी करुन त्याला कठोरात कठोर शिक्षा देवू. मला असं वाटतं की, याबाबत महाराष्ट्रात सर्वांचं एकमत आहे. आमच्यासाठी तर कारवाई ही राजकारणाच्या पलिकडे आहे. पण काही लोक या प्रकरणावरुनही राजकारण करताना दिसत आहेत. पण मी स्पष्ट सांगू इच्छितो की, आम्ही अशाप्रकारच्या राजकारणाला महत्त्व देत नाही. सरकारला जी कारवाई करयाची आहे ती सरकार करेल, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.




या प्रकरणात १२ गुन्हे दाखल झाले आहेत. रोज नवी माहिती समोर येत आहे. आता एसआयटी काय तपास करते हे रोज सांगता येणार नाही. एसआयटी योग्य वेळी माहिती देईल. मला असं वाटतं की, आपल्याला एसआयटीवर विश्वास ठेवावा. एसआयटी उत्तम कार्य करत आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अशोक खरातची निश्चितपणे ईडी चौकशी होणार. त्या संदर्भात ईडीने या गोष्टीची माहिती घेतलेली आहे. त्यांनीही कारवाई सुरु केलेली आहे. एकदा जमीन आयडेन्टीफाय झाली की नियमानुसार त्यात जे-जे करायचं ते आम्ही करु, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

अशाप्रकारचा सीडीआर प्राप्त करुन घेण्याचा अधिकार कुणालाही नाही. केवळ तपास अधिकाऱ्यांना तो सीडीआर मिळवण्याचा अधिकार आहे. तो सीडीआर कशापद्धतीने लीक झाला, तो कुणी लीक केला, या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करेल. या अशा प्रकारच्या संवेदनशील प्रकरणांमध्ये केवळ आरोप-प्रत्यारोप करुन चालत नाही. ज्यांच्या विरुद्ध सबळ पुरावा असेल, त्यांच्या विरुद्ध कारवाई होईल. कोणल कुणाशी बोललं याच्या आधारावर कायदेशीर प्रक्रिया चालत नाही. अशोक खरातने केलेल्या घाणेरड्या कामांमध्ये ज्यांचा समावेश असेल त्यापैकी कुणालाही आम्ही सोडणार नाहीत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## बोलेरोने टँकरला दिली धडक; अपघातात पाच जण ठार, अनेक जण जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उत्तर प्रदेश: उत्तर प्रदेशातील बरेली जिल्ह्यातून एक मोठी बातमी समोर येत आहे. सीबीगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परधोली जवळ झालेल्या एका भीषण रस्ते अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या एका बोलेरो गाडीने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका टँकरला धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की गाडी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली. अपघातानंतर, मृतदेह बाहेर काढण्यासाठी बोलेरो गाडी तोडावी लागली. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. जखमींना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, लखनौहून भरधाव वेगाने येणाऱ्या एका बोलेरो कारने बरेलीच्या सीबीगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील परधोलीजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका टँकरला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, अनेक जणांचा जागीच मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, बोलेरो अतिशय भरधाव वेगाने धावत होती. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट टँकरला धडकली. या धडकेनंतर वाहनाचा पुढचा भाग पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आणि गाडीतील प्रवासी आत अडकले. अपघाताची माहिती मिळताच, पोलिसांचे एक पथक तात्काळ घटनास्थळी पोहोचले, मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. अपघातानंतर एक मुलगा गाडीत अडकला होता. त्याला बाहेर काढण्यासाठी पोलीस व वाटसरूंनी बचावकार्य सुरू केले. कटर आणि इतर उपकरणांच्या साहाय्याने गाडी कापून मुलाला बाहेर काढण्यात आले. तसेच धडक बसल्यानंतर लगेचच मागून येणाऱ्या एका मोटरसायकलनेही गाडीला धडक दिली, ज्यामुळे अपघाताची तीव्रता आणखी वाढली. पोलिसांनी अपघाताच्या कारणांचा तपास सुरू केला आहे. प्राथमिक तपासानुसार, अतिवेग आणि निष्काळजीपणा ही अपघाताची कारणे असल्याचा संशय आहे.






## संभाजीनगरमध्ये मन हेलावणारी घटना; पोहायला गेलेल्या तलावात बुडून ४ तरुणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर: सध्या उन्हाळ्यामुळे अंगाची लाही लाही होत असून उन्हाळ्यातील सुट्टीत पोहण्याचा आनंद घेण्याचा वेगळाच छंद असतो. त्यामुळे, विहिर, तलाव किंवा नदी पात्रात पोहण्यासाठी तरुणाईसह वडीलधारीही पुढे असतात. मात्र, छ. संभाजीनगर शहरालगत असलेल्या हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या घटनेनं परिसरात शोककळा पसरली असून शोक व्यक्त होत आहे. दरम्यान, मृतांपैकी दोघांची आ-ेळख पटली असून इतर दोघांची ओळख पटविण्याचं काम पोलिसांकडून सुरू होतं. हर्सुल तलावात तरुण मुले बुडाल्याची आणि सुरुवातीला तीन तरुण तलावात बुडाल्याची माहिती अग्निशामक दलाला मिळाली होती. त्यानुसार, अग्निशमन पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पथकाच्या मदतीने बचावकार्य करत तिघांचे मृतदेह तुरुंगातून बाहेर काढण्यात आले. दरम्यान, तलावाच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक तरुण बुडाल्याची माहिती मिळाल्यानंतर अग्निशामक दलाने तेथेही शोधमोहीम राबवली असता चौथ्या तरुणाचाही मृतदेह पाण्यात आढळून आला.

रविवारची सुट्टी असल्याने हे सर्व तरुण तलावात पोहण्यासाठी गेले होते, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. मात्र , हा रविवार त्यांच्या आयुष्यात शेवटचा ठरल्याची दु:खद घटना घडली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृतांपैकी अफान खान आणि आदिल शेख अशी दोघांची नावे समोर आली असून उर्वरित दोघांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. तलावात बुडालेल्या चौघांचेगी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## हवामान खात्याचा अलर्ट; महाराष्ट्रात मेघगर्जनेसह पाऊस, अनेक जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह गारपिटीचा इशारा

मुंबई: महाराष्ट्रात गेल्या अनेक दिवसांपासून हवामान झपाट्याने बदलतं आहे. त्यामुळे हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पावासचा अंदाज वर्तवला आहे. यामुळे, रविवारी, ५ एप्रिलदरम्यान, अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. वारांवर बदलत्या हवामानामुळे अधिकाऱ्यांनी नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे.

मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि पालघरसह कोकणातील काही भागांत दिवसभर उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे.५ एप्रिल रोजी, मुंबईत कमाल तापमान ३० ते ३४ अंश सेल्सिअस दरम्यान नोंदले जाण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान २४ ते २७ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणीसारख्या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळ आणि मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे पिकांचे संरक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला आहे.



तसेच, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये अलर्ट नाही. पण चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. वीजांसह पावसाची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अदांज असून वादळाच्या वेळी नागरिकांना मोकळ्या जागेवर जाणे टाळून निवारा घेण्याचे आवाहन केलं आहे. दरम्यान, पश्चिम महाराष्ट्रात सध्या कोणताही अलर्ट नसला तरी बदलत्या वाऱ्यांमुळे काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**'आयएमडी' कडून ऑरेंज अलर्ट**

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) शनिवारी अनेक राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला असून, या सर्व ठिकाणी गारपीट, मेघगर्जना, वीज आणि ताशी ६०-७० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहतील, असा अंदाज वर्तवला आहे.

अलर्ट दिलेल्या राज्यांमध्ये पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, पूर्व उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या भागांचा समावेश आहे. पुढील २४ तासांत या प्रदेशांमध्ये गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह तीव्र हवामान बदलाची शक्यता आहे, असेही 'आयएमडी'ने म्हटले आहे.

### युद्ध नको, बुद्ध हवा; ठाण्यात आठव्या आंतरराष्ट्रीय धम्म परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिला समतेचा संदेश

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'बुद्ध रत्न' पुरस्कार प्रदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : बौद्ध धम्म हा केवळ धर्म नसून एक व्यापक सामाजिक विचारसरणी आणि परिवर्तनाची चळवळ आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांनी केले. सम्राट अशोक जयंतीनिमित्त आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय बौद्ध धम्म परिषदेत ते बोलत होते.

बुद्धरत्न सागर वेलफेअर फाउंडेशनतर्फे (ईींववहरीींपर डरसरी थशश्रषरीश ऋेीप-वरींळेप) गडकरी रंगायतन येथे हा भव्य कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात नमो बुद्धाय, नमो धम्माय, नमो संघाय या मंत्रोच्चारांनी झाली. गौतम बुद्ध (ऋीींरार ईींववहर) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून शिंदे यांनी उपस्थित भिक्खू संघ, विद्वान आणि धम्मप्रेमींचे स्वागत केले.



या कार्यक्रमाला खासदार ज्योती वाघमारे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, तसेच विविध देशांतून आलेले भिक्खू उपस्थित होते. ठाण्याच्या ऐतिहासिक वारशाचा उल्लेख करताना शिंदे म्हणाले की, सम्राट अशोक आणि सातवाहन काळात या भागात बौद्ध धर्माचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता. कान्हेरी लेणी आणि प्राचीन सोपारा येथील स्तूप हे त्याचे महत्त्वाचे पुरावे आहेत.

धम्म परिषद ही सामाजिक परिवर्तनाची महत्त्वाची पायरी असल्याचे सांगत त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. या वेळी शिंदे यांना 'बौद्ध रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अशा सन्मानांमुळे जबाबदारी वाढते आणि समाजासाठी अधिक काम करण्याची प्रेरणा मिळते, असे त्यांनी नमूद केले.

शिंदे यांनी महाकवी वामनदादा कर्डक थरारप ऊवर घरीवरज्ञ यांच्या ओळी उद्धृत करत बौद्ध विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. बौद्ध धम्म हा दुःखातून मुक्ती देणारा मार्ग असून तो सत्य, अहिंसा आणि करुणेवर आधारित जीवनपद्धती आहे, असे त्यांनी सांगितले.

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या धम्मदीक्षेमुळे लाखो लोकांना समानता आणि स्वाभिमानाचा मार्ग मिळाला, असेही त्यांनी स्पष्ट केले. बुद्ध पेरला की बाबासाहेब उगवतात, असे म्हणत त्यांनी गौतम बुद्धांच्या विचारांचा समाजावर झालेला प्रभाव अधोरेखित केला.

जागतिक तणावाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी शांततेचा संदेश देताना जगाला युद्ध नको, बुद्ध हवा, असे सांगितले. द्वेषाने द्वेष संपत नाही, प्रेमानेच तो संपतो, हा बुद्धांचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाषणाचा समारोप करताना त्यांनी, न तलवार की धार से, न गोलियों की बौछार से दुनिया बदलेगी तो सिर्फ बुद्ध के विचार से, या ओळींमधून शांततेचा आणि मानवतेचा संदेश दिला.

## पश्चिम आशियात युद्ध तीव्र; इस्त्रायलचे इराण-लेबनॉनमध्ये मोठे हवाई हल्ले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जेरुसलेम : पश्चिम आशियामध्ये अमेरिका-इस्त्रायलसोबत सुरू असलेल्या इराणच्या युद्धाला पाच आठवड्यांहून अधिक काळ लोटला आहे. दरम्यान, इस्त्रायली संरक्षण दलांनी (आयडीएफ) इराण आणि लेबनॉनमध्ये मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाई करत २०० हून अधिक इराणी तसेच लेबनॉनमधील १४० हिजबुल्ला ठिकाणांना लक्ष्य केले आहे. ही मोहीम लांब पल्ल्याच्या हल्ला क्षमतेला कमकुवत करणे आणि इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी)च्या संरक्षण नेटवर्कला उद्ध्वस्त करण्याच्या उद्देशाने राबवण्यात आली. आयडीएफने इराणमधील अनेक महत्त्वाच्या ठिकाणांवर हल्ले केले. यामध्ये आयआरजीसीचे एक केंद्रीय ठिकाण समाविष्ट होते, जिथे विविध प्रकारची शस्त्रे साठवून ठेवली होती. आयआरजीसीच्या हवाई संरक्षण प्रणालींनाही लक्ष्य करण्यात आले. तसेच विमानांना लक्ष्य करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या उत्पादन, साठवण आणि विकासाशी संबंधित केंद्रांवरही हल्ले झाल्याची पुष्टी करण्यात आली आहे.



लेबनॉनमध्ये आयडीएफने मुख्यतः हिजबुल्लाच्या वरिष्ठ नेतृत्व आणि विशेष दलांविरोधात हवाई हल्ले केले. लक्ष्य केलेल्या ठिकाणांमध्ये हिजबुल्लाचे प्रशिक्षण केंद्र तसेच अनेक शस्त्रसाठा आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण स्थळांचा समावेश होता. अधिकृत निवेदनानुसार, हिजबुल्लाच्या रदवान फोर्स मुख्यालयावर झालेल्या यशस्वी हल्लयामुळे संघटनेच्या कमांड संरचनेला मोठा धक्का बसला आहे. इस्त्रायलचे पंतप्रधान बेन्यामिन नेतन्याहू यांनी या हल्लयांमुळे इराणच्या औद्योगिक पायाभूत सुविधांना मोठे नुकसान झाल्याची पुष्टी केली आहे. त्यांच्या मते, इराणच्या सुमारे ७० टक्के इस्पात उत्पादन क्षमतेचा नाश झाला असून, यामागचा उद्देश आयआरजीसीला आर्थिक स्रोतांपासून तसेच मोठ्या प्रमाणावर शस्त्रनिर्मिती करण्याच्या क्षमतेपासून वंचित ठेवणे हा आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### पुन्हा अलर्ट

महाराष्ट्रात गेल्या अनेक दिवसांपासून हवामान झपाट्याने बदलतं आहे. त्यामुळे हवामान विभागाकडून महाराष्ट्रात अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पावासचा अंदाज वर्तवला आहे. अनेक भागांत विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. वारांवर बदलत्या हवामानामुळे अधिकाऱ्यांनी नागरिकांना आवश्यक खबरदारी घेण्याचा सल्ला दिला आहे. मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि पालघरसह कोकणातील काही भागांत दिवसभर उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि परभणीसारख्या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वादळ आणि मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे पिकांचे संरक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याचा सल्ला शेतकऱ्यांना देण्यात आला आहे. तसेच, उत्तर महाराष्ट्रातील जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये अलर्ट नाही. पण चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. वीजांसह पावसाची शक्यता असल्याचा हवामान विभागाचा अदांज असून वादळाच्या वेळी नागरिकांना मोकळ्या जागेवर जाणे टाळून निवारा घेण्याचे आवाहन केलं आहे. दरम्यान, पश्चिम महाराष्ट्रात सध्या कोणताही अलर्ट नसला तरी बदलत्या वाऱ्यांमुळे काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) शनिवारी अनेक राज्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला असून, या सर्व ठिकाणी गारपीट, मेघगर्जना, वीज आणि ताशी ६०-७० किलोमीटर वेगाने सोसाट्याचे वारे वाहतील, असा अंदाज वर्तवला आहे. अलर्ट दिलेल्या राज्यांमध्ये पंजाब, हरियाणा, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, पूर्व राजस्थान, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, पूर्व उत्तर प्रदेश आणि छत्तीसगड या भागांचा समावेश आहे. पुढील २४ तासांत या प्रदेशांमध्ये गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह तीव्र हवामान बदलाची शक्यता आहे.

# नाशिक शहरातील प्रत्येक मालमत्ता धारकाला प्रॉपर्टी कार्ड देणार : महसूलमंत्री बावनकुळे

## आडगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

नाशिक (जिमाका वृत्तसेवा) : नाशिक शहरातील प्रत्येक मालमत्ता धारकाला लवकरच प्रॉपर्टी कार्ड देण्यात येणार असून नागरिकांची कामे मंत्रालयाऐवजी गावपातळीवरच होण्यासाठी शासन प्राधान्याने प्रयत्न करत आहे, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

आज नाशिक तहसील व अपर तहसील कार्यालयातर्फे आडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री श्री. बावनकुळे बोलत होते. यावेळी आमदार डराहुल ढिकले, विभागीय आयुक्त डॉ प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, अपर जिल्हाधिकारी देवता केकाण, उपजिल्हाधिकारी शुभांगी भारदे, मुद्रांक जिल्हाधिकारी संदिप आहेर, भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक महेश इंगळे, तहसीलदार पंकज पवार, अपर तहसीलदार अमोल निकम, धान्य वितरण अधिकारी शामली धपाडे, नगरसेविका इंदुबाई खेताडे रिद्धेश निमसे, ड. नामदेव शिंदे, यांच्यासह अधिकारी, पदाधिकारी, नागरिक व लाभार्थी उपस्थित होते.

महसूल मंत्री श्री बावनकुळे म्हणाले की, १ जानेवारी २०११ पूर्वी सरकारी जागेवर वास्तव्यास असलेल्या नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयामुळे अशा नागरिकांना त्यांच्या मालमत्तेचा अधिकृत व कायदेशीर पुरावा मिळणार आहे. प्रॉपर्टी कार्डमुळे मालकी हक्क स्पष्ट होऊन बँक कर्ज, शासकीय योजना, तसेच विविध शासकीय प्रक्रियांसाठी आवश्यक कागदपत्रे सुलभपणे उपलब्ध होतील. तसेच दीर्घकाळापासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना दिलासा मिळणार असून त्यांच्या मालमत्तांना कायदेशीर मान्यता मिळण्यास मदत होणार आहे. तसेच, महसूल विभागामार्फत वन डिस्ट्रिक्ट वन रजिस्ट्रेशन ही संकल्पना राबविण्यात येत असून, नागरिकांना जिल्ह्यात कुठेही आपल्या मालमत्ता नोंदणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे वेळेची बचत होऊन प्रशासकीय प्रक्रिया अधिक सुलभ होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांचे प्रश्न त्वरित सोडवण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन महत्त्वाचे असून, नागरिकांना



मंत्रालयात जाण्याची गरज भासू नये, ही शासनाची भूमिका आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये आगामी काळात अशा प्रकारची शिबीरे राबविण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श समोर ठेवून या शिबीरात आलेला प्रत्येक लाभार्थी समाधानी चेहऱ्याने गेला पाहिजे हीच शिबीरांच्या आयोजनामागील शासनाची प्रमुख भूमिका आहे. यामुळे शेतकरी व नागरिकांना एक हक्काचे व्यासपीठ या माध्यामातून उपलब्ध झाले आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराच्या पहिल्या टप्प्यातून महाराष्ट्रात जवळपास २ लाख ९० हजार लाभार्थ्यांना विविध लाभ प्रदान केले गेले आहेत. तर नाशिक जिल्ह्यात १२ हजार २५९ नागरिकांना याचा लाभ झाला आहे. शेतकरी व नागरिकांच्या हितासाठी शासनाने ४८ निर्णय घेतले आहेत. महसूल विभागातील पदांचा सुधारित आकृतीबंधास मंजुरी घेण्यात आली असून जिल्हाधिकारी यांना विशेष अधिकार प्रदान केल्यामुळे नागरिकांना १५ दिवसांत शेत मोजणी करून मिळणार असल्याचे मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले. शासन निर्णय १८ फेब्रुवारी, २०२६ अन्वये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा क्रमांक १ ची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सूरू असून १५ तालुक्यातील १२१ महसूल मंडळात शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. ७ मार्च व १४ मार्च रोजीच्या २४ आयोजित शिबीरांच्या माध्यमातून २ हजार ५५ फेरफार निर्गत करण्यात आले आहेत. ७/१२ मधील दुरूस्तीसाठी ९४५ अर्ज स्विकारण्यात आले असून ६ हजार ७५० डिजिटल ७/१२ व ७ हजार ७४२ खाते उतारे वितरीत करण्यात आले आहे. यापुढे १० व १२ एप्रिल तसेच ८ व १५ मे या तारखांना नियोजित आहेत. आजच्या आयोजित शिबीरात ५६० उत्पन्न दाखले, १४९ रेशनकार्ड, ६३ लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार अनुदान योजना लाभ, २ तुकडेबंदी सुधारणा सललेखा योजना लाभ व १२६ लाभार्थ्यांना ७/१२ वितरीत केले जाणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी शुभांगी भारदे यांनी प्रास्ताविकातून दिली. महसूल मंत्री यांच्या हस्ते डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२, ८-अ उतारे, उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमिलेअर प्रमाणपत्र, वय, राष्ट्रीयत्व, आधिवास प्रमाणपत्र, विद्यार्थ्यांसाठी दाखले, संजय गांधी निराधार अनुदान योजना लाभ, ई शिधापत्रिका, रेशनकार्ड, तुकडेबंदी तुकडे जोड अशा विविध लाभांचे प्रदान प्रातिनिधिक स्वरूपात करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार मुद्रांक जिल्हाधिकारी श्री आहेर यांनी मानले.

# दिल्लीत पुन्हा पावसाची शक्यता, हवामान विभागाने दिला सतर्कतेचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: भारतीय हवामान विभागाने मंगळवारी दिल्लीसाठी पावसाचा इशारा दिला आहे. आयएमडीने म्हटले आहे की, आणखी एक पश्चिमी प्रणाली सक्रिय असून, तिचा प्रभाव ७ आणि ८ एप्रिल रोजी सर्वाधिक दिसून येईल. यामुळे मंगळवारी संध्याकाळी दिल्लीत पावसाची दाट शक्यता आहे. दरम्यान, सध्याच्या सक्रिय पश्चिमी प्रणालीमुळे देशाच्या वायव्य भागात पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे. काश्मीर खोऱ्यातील काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडू शकतो. जम्मू आणि काश्मीरच्या डोंगराळ भागात गेल्या अनेक दिवसांपासून हिमवृष्टी सुरू आहे. दरम्यान, आंतरराष्ट्रीय हवामान विभागाने (आयएमडी) मंगळवारसाठी यलो अलर्ट जारी केला असून, दिवसा एक किंवा दोन वेळा अतिशय हलक्या पावसाच्या सरी, तसेच मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३०-४० किमी वेगाने वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यांचा अंदाज वर्तवला आहे. मंगळवारी संध्याकाळी हलक्या पावसाची आणखी एक सर अपेक्षित आहे.

हिमाचलमध्ये बर्फवृष्टी आणि पाऊस हिमाचल प्रदेशातील अनेक भागांमध्ये हलका ते मध्यम पाऊस आणि हिमवृष्टी झाली, ज्यामुळे किमान आणि कमाल तापमानात घट झाली. शनिवारी शिमला हवामान कार्यालयाने ७ आणि ८ एप्रिल रोजी चार ते पाच जिल्ह्यांमध्ये गारपिटीच्या शक्यतेबाबत ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. शुक्रवार संध्याकाळपासून गेल्या २४ तासांत लाहौल स्पिती आणि कुल्लूच्या उंच भागांमध्ये नवीन हिमवृष्टी झाली. गोंडलामध्ये १३ सेमी, हान्सा आणि केलाँगमध्ये ७.५ सेमी आणि कोक्सरमध्ये ३ सेमी बर्फवृष्टी झाली.



शुक्रवारी रात्री अटल बोगद्याजवळही हलकी हिमवृष्टी झाली. राज्याच्या विविध भागांमध्ये अधूनमधून पावसाची नोंद झाली.

राजस्थानमध्ये अनेक ठिकाणी पाऊस

राजस्थानमधील पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे गेल्या २४ तासांत अनेक भागांमध्ये पाऊस आणि गारपिटीची नोंद झाली आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, पाऊस सुरूच राहील. हवामान विभागाने सांगितले की, गेल्या २४ तासांत पश्चिमी वाऱ्यांच्या प्रभावामुळे पूर्व राजस्थानच्या काही भागांमध्ये आणि पश्चिम राजस्थानच्या इतर भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांसह हलका ते मध्यम पाऊस झाला. या कालावधीत सर्वाधिक पाऊस पश्चिम राजस्थानमधील करणपूर येथे ११.५ मिमी आणि पूर्व राजस्थानमधील उदयपूरच्या कोटाडा येथे ३२ मिमी झाला. विभागाच्या माहितीनुसार, आज जयपूर, अजमेर, भरतपूर, कोटा आणि उदयपूरच्या काही भागांमध्ये ताशी ४०-५० किमी वेगाच्या वाऱ्यासह जोरदार मेघगर्जना, पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे. बिकानेर आणि जोधपूर विभागांच्या बहुतांश भागांमध्ये हवामान मुख्यतः कोरडे राहण्याची शक्यता आहे.

# निफाडला मराठी गझल मुशायरा संपन्न

### कवी संजय आहेर, गुलाब टकले,पराग कातकडे, जयश्री वाघ, बाळासाहेब गिरी, यांनी जिंकली कवी रशीकांची मने



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : निफाड येथील जिजाई प्रतिष्ठान व श्री माणकेश्वर सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने श्री लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहात गझलसंध्या कार्यक्रमात मराठी गझल मुशायरा हा कार्यक्रम संपन्न झाला.

लक्ष्मी ग्रामीण बिगर शेती नागरी पतसंस्थेचे संस्थापक नंदलाल चोरडिया हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा दूध संघाचे माजी अध्यक्ष शिवाजी ढेपले, श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, जिजाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुलाब टकले, मंदाकिनी टकले आदी मान्यवर यावेळी मंचावर उपस्थित होते.

मान्यवरांच्या यथोचित सत्कारानंतर जिजाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुलाब टकले यांनी या कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. या मराठी गझल मुशायऱ्याच्या कार्यक्रमात गझलकार संजय आहेर, बाळासाहेब गिरी, पराग कातकाडे जयश्री वाघ व गुलाब टकले यांनी बहारदार मराठी गझल सादर करत श्रोत्यांची मने जिंकली.

**मंदिरी मी दिवा रोजचा लावला**
**ना कधीही मला देव हा पावला ।।**
**देव शोधायला हिंडलो मी किती?**
**माय बापामधे तो मला घावला ।।**
**अशी एक वेगळी मांडणी करत गझलकार संजय आहेर यांनी आजच्या वास्तवावर बोट ठेवतानाच**
**असा घाव घालून गेली उराला**
**कसा आडवू आसवांच्या पुराला।।**
**उजेडात केलास तू घात माझा**
**कसा दोष देऊ उगा भास्कराला ।।**

ही प्रेम विरहाची नजकत मांडली.

गझलकार बाळासाहेब गिरीनी आपल्या लेकीविषयी भावना व्यक्त करताना गझलेत मांडले कि,

**डोळे असतील वाट नेहमी पाहत माझी**
**माझ्यासाठी लेक राहते जागत माझी ।।**
**गतजन्माचे पुण्य फळाला आले माझ्या**
**लेक आहेच या जन्माची दौलत माझी ।।**

तसेच आयुष्याविषयी भावना व्यक्त करताना सौ जयश्रीताई वाघ म्हणतात

**कलत्या दिवसाकाठी थोडे कातर होतो आपण**
**असेल कडवट जीवन तरीही साखर होतो आपण**
**तसे नित्य काठिण्य मांडतो हृदयासाठी तरीही**
**बुध्दाच्या पण कारुण्याचे पाझर होतो आपण**

पराग कातकाडे यांनी भावना व्यक्त करताना गझल सादर केली.

**फेडतो बघ जुनी उधारी तूझी**
**चालतो विठ्ठला आज वारी तूझी**

कवी गझलकार गुलाब टकले यांनी कुटुंबाविषयी गझल सादर केली.

**वादविवाद ही हवे अन् संवादही हवे**
**कुटुंब जिवंत असण्याचे हेच पुरावे हवे**
**संकटात ही होतात किती कुटुंब उद्धवस्त**
**सावरण्या आई वडीलांचे आशीर्वाद हवे,**

याप्रसंगी ,नगरसेवक साहेबराव बर्डे,माजी नगरसेवक देवदत्त कापसे दत्ता उगावकर, दिलीप कापसे, संजय गाजरे,कवी माधव जाधव ,बी बी गुंजाळ, निंबाजी बोरसे,ॲड वनसे,बाळासाहेब कापसे, , सुनील चिखले, खालकर सो,एस एम सोनवणे,अशोक पगारे, राजेंद्र खालकर, कापडी, परवेझ शेख , दिलीप कुंभार्डे, कृष्णा बनकर, वैभव कर्डीले , सुहास सुरळीकर , आशु कापसे , संतोष ससाणे, सुजाता तनपुरे, जाधव मॅडम, प्रा आहेर, कुंभार्डे , एस एस कापसे, ए.एम. भामरे , डॉ.महेश बनकर, श्रीमती एस एस पवार, संजय घुमरे, संगीता गाजरे, योगिता भामरे, योगिता निगळ, राजेंद्र भवर, राजेश लोखंडे, रफीक शेख आदींसह नागरिक उपस्थित होते

# यंदाच्या भीम जयंतीला वाजणार 'भीम ललकारी' गाण...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी : येथील रहिवासी झाडीपट्टीचे गीतकार व गायक संगमकुमार नंदागवळी यांनी तयार केलेले नवीन भीमगीत भीम ललकारी हे गीत यंदा १४ एप्रिलला गाजणार असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे. नागरिकांनी खूप प्रतिसाद देत पसंती केली आहे. या गीताने एक वेगळीच भरारी घेतली आहे.

आपल्या गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनीमोरगाव येथे राहणारे कलावंत, गीतकार, गायक संगमकुमार नंदागवळी यांनी हे भीम गीत तयार केले आहे. या आधी सुध्दा अनेक गीतांचे गायन केले आहे. मात्र हे गीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविल्याशिवाय राहणार नाही.

सर्व स्तरावर सदर गीताची चर्चा होत असून हे वाजत आहे. यंदा भीम जयंतीनिमित्त हे गाण वाजणार आहे. रसिक याचा आनंद लुटणार आहेत असे दिसते. या गीतामधून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे गुणगान यांचा गौरव करण्यात आला आहे.

या १४ एप्रिल रोजी साजऱ्या होणाऱ्या भीम जयंती निमित्त 'भीम ललकारी' हे भीमगीत राज्यभर चर्चेचा विषय ठरत असून, उत्सवाचे प्रमुख आकर्षण बनण्याची चिन्हे दिसत आहेत.




### नागरिकांची उत्स्फूर्त पसंती : संगम नंदागवळी यांची उंच भरारी

अर्जुनी मोरगाव येथील झाडीपट्टीतील प्रतिभावान गीतकार व गायक संगमकुमार नंदागवळी यांनी साकारलेले हे गीत सध्या सर्व स्तरावर लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचत आहे. गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागातून आपल्या कलेच्या जोरावर नाव कमावणाऱ्या संगमकुमार नंदागवळी यांनी 'भीम ललकारी' या गीतातून भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रभावी दर्शन घडवले आहे.

सामाजिक परिवर्तन, समानता आणि न्याय या मूल्यांचा संदेश देणारे हे गीत रसिकांच्या मनाला भिडत आहे. दरम्यान, 'भीम ललकारी' हे गाणे डरपसराझींरी छरपवरसुरश्रळ या युट्यूब चॅनेलवर अधिकृतरित्या प्रदर्शित करण्यात आले असून, रिलीज होताच प्रेक्षकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. काहीच दिवसांत हजारो लोकांनी हे गीत पाहिले असून, सोशल मीडियावर त्याची मोठ्या प्रमाणात चर्चा रंगली आहे. व्हॉट्सॲप, फेसबुक आणि इतर डिजिटल माध्यमांवर हे गाणे वेगाने शेअर होत आहे. या गीताची खासियत म्हणजे त्यातील दमदार शब्दरचना, जोशपूर्ण संगीत आणि उर्जादायी सादरीकरण. त्यामुळेच हे गीत तरुणाईसह सर्व वयोगटातील लोकांना भावत आहे. विशेषतः भीम जयंतीच्या मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सार्वजनिक उत्सवांमध्ये हे गाणे मोठ्या प्रमाणावर वाजणार असल्याचे चित्र दिसत आहे.

संगमकुमार नंदागवळी यांनी यापूर्वीही अनेक सामाजिक व सांस्कृतिक विषयांवर आधारित गीते सादर केली आहेत. मात्र 'भीम ललकारी' या गीताने त्यांच्या कलात्मक कारकिर्दीत नवे पर्व सुरू केले असून, स्थानिक कलाकार म्हणून त्यांनीराज्यस्तरावर ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशामुळे झाडीपट्टीतील इतर नवोदित कलाकारांनाही प्रेरणा मिळत आहे. युट्यूबवर गाणे प्रदर्शित झाल्यानंतर गायकाने प्रेक्षकांना आवाहन केले आहे की, त्यांनी हे गाणे पाहून लाईक, शेअर आणि सबस्क्राईब करून सहकार्य करावे. प्रेक्षकांचा प्रतिसाद हा कलाकारासाठी सर्वात मोठा पुरस्कार असतो, असेही त्यांनी नमूद केले.

भीम जयंतीच्यापार्श्वभूमीवर गावागावात सध्या तयारीला वेग आला असून, 'भीम ललकारी' या गीतामुळे उत्सवाचे वातावरण अधिकच रंगतदार होणार आहे. एकूणच, अर्जुनी मोरगावच्या या तरुण कलाकाराने आपल्या कलेच्या माध्यमातून सामाजिक संदेश देत भीम जयंतीला एक नवी ऊर्जा दिली असून, यंदा या गीताची गूंज केवळ जिल्ह्यातच नव्हे तर राज्यभर ऐकू येणार, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# एॅग्रो कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक!

## शेतकऱ्यांकडून कंपनीवर कारवाई करण्याची मागणी; न्याय न मिळाल्यास आत्महत्येशिवाय पर्याय नसल्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कृष्णात विष्णू बोंगे मी भोसे या ठिकाणचा रहिवाशी असून मी व माझे वडील आई व पत्नी व दोन मुले एक मुलगी असं कुटुंब आहे आमचा व्यवसाय म ोलमजुरी करून जगणे मुलाला शाळा शिकवणी कुठल्याही स्वरूपाचा घर व जमीन नाही दारिद्र्यरेषेतील रेशन कार्ड असल्यामुळे गहू तांदूळ मिळा- लेली खाऊन जगणे अद्याप आम्ह- ाला कुठल्याही स्वरूपाची शासकीय मदत मिळालेली नाही तरी आमची परिस्थिती सुधारण्यासाठी अजून परिश्रम घ्यावयाची ठरवले व त्याला काहीतरी जोडधंदा करायचे ठरवले आम्ही सर्व घरातील कुटुंबाने आणि जमिनीशाने करायची ठरवली यातून मिळालेल्या पैशातून आम्ही मुला- चे शिक्षण व घर खर्च चालवला अजून म्हणून आमची परिस्थिती सुधारण्यासाठी मी एक विचार केला त्याचवेळी आम्हाला दुग्ध व्यवसाय करावा असे वाटले व मी दुग्ध व्यवसाय करायचा ठरवला त्यासाठी मी दोन गाई आणल्या व दूध वाढत राहिल्याने




२०१९ स*** डिसेंबर महिन्यामध्ये मला कळाले की आपल्या गावा- तील भोसे या ग्रुप प्रोड्यूसर कंपनी दुधाच्या गाई साठी कर्ज देत आहे मग मी ते घ्यायची ठरविले व त्याची चौकशी करू लागलो व मी अनवर बाबूलाल शेख यांच्याकडे गेलो गेल्यानंतर मला देखील कर्ज घ्यायचे आहे त्याच्यासाठी काय कागदपत्रे लागतात ती म्हणाली मी एक स्टॅम्प कोरा आधार कार्ड पॅन कार्ड रेशन कार्ड आणि फोटो ही कागदपत्रे घेऊन ये तुला कर्ज मंजूर करतो मग मी आई वडील भाऊ पत्नी यांची सर्व कागदपत्रे घेऊन कोरा स्टॅम्प घेऊन त्यांच्याकडे गेलो होतो त्यांनी मला तुझे प्रकरण लवकरात लवकर मंजूर होईल म्हणून सांगितले चार दिवसांनी या सह्या करून सर्व कागदपत्रे आम्ही चार दिवसांनी गेलो यानंतर त्यांनी आमच्याकडून सर्व कागदपत्राची सह्या घेतल्या व त्यामध्ये त्यांनी आम च्या बँकेच्या कोऱ्या पेट्रोल वरती सह्या घेतल्या फसवणूक झाल्याची समजले आई वडील पत्नी यांची कर्ज प्रतिव्यक्ती एक लाख ४० हजार प्रमाणे कर्ज मंजूर केले व त्यातील पहिला हप्ता ७० हजार एवढा कंपनीने वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँकेमध्ये जमा केला व माझे व माझ्या भावाने कर्ज मंजूर केले पण मला माझ्या भावाला कुठल्याही स्वरूपाचे पैसे दिले नाहीत कर्जही कुठले अकाउंट वर वरती पैसे जमा केलेली नाहीत.

याची विचारणा केली असता त्यांनी टाळाटाळीची उत्तरे दिली व काही काही दिवसांनी कोरोना आला. त्यानंतर कोणीही कोणाला पैसे देना कोणी कुणाचा जवळ येना अशा स्वरूपाची परिस्थिती झाली व या काळामध्ये आम्ही शेतीमध्ये काम करत राहिलो गेलो व २०२४ मध्ये आम्हाला वैनगंगा कृष्णा ग्रामीण बँकेच्या नोटिसा येऊ लागल्या व तुम्ही आमचे थकीत कर्ज बारा म्हणून आम्ही बँकेमध्ये चार पोस्ट केले असता त्यांनी सांगितले की तुमचे पैसे भरावे लागतील मग आम्ही भोस- री एॅग्रो प्रोडूसर कंपनीला विचारले की आम्हाला तुम्ही आई-वडील व पत्नीच्या नावे तीन हप्ते दिले व बाकीचे हप्ते दिलेली नाहीत का दिले नाहीत त्यांनी सांगितले आम्ही ते आम्ही भरतो असे अन्वर शेख यांनी सांगितले व आम्हाला त्यांनी शब्द दिला व आम्ही आमच्या गटातील सर्व माणसांना विचारले की तुम्हाला दुसरा हप्ता दिला का तर त्यांनी सगळी सांगितली की आम्हाला दुसरा हप्ता दिलेला नाही त्यांनी परस्पर आपल्या सगळे ज्या कोरा विड्रॉल वरती सह्या घेऊन आपली दुसरी हप्ते अन्वर शेख यांनी घेऊन खरचले असे सर्वांनी सांगितले व आमची फसवणूक झा- लेली आम्हाला कळाले व आम्ही सारखे त्यांच्याकडे जाऊन भरण्यास सांगितले तरी त्यांनी आज तागायत कुठल्याही स्वरूपाचे रक्कम बँकेने जमा केलेली नाही म आम्हाला दिलेली ही नाही व त्यांना भेटल्यानंतर त्यांची पूर्ण व्हिडिओ शूटिंग पैसे भरतो म नाने सर्व तयार केलेले आहेत वारंवार फोन केलेला ही त्यांचे फोन रेकॉर्डिंग माझ्याकडे आहे व त्यांनी आमची फसवणूक केली आहे आम्ही मजूर असल्या कारणाने आम्हाला कोणी कुठल्याही स्वरूपाचा न्याय मिळणे कठीण आहे त्वरित फसवणूक करणारे लोक अतिशय गुंड व श्रीमंत असल्याने तेथे आम्हाला न्याय मिळणे कठीण झाले आमचे सिविल खराब झाल्याने आम्हाला कुठलेही बँकेमध्ये कुठल्याही स्वरूपाची कर्ज मिळत नाही त्यामुळे आमची परिस्थिती पूर्ण हलकेच आहे व आम्ह- ाला कामाला गेल्यावरच दोन टाईम जेवणाची सोय होत नाही गेल्यास आमच्यावर उपासमारी वेळ येते आम्हाला राहायला घरी नाही ज्यादा त्या त्यांच्या विरोधात कालवा केला की आम्हाला राहण्यासाठी दबाव येऊ शकतो आमची घोर फसवणूक झाल्याची आमची परिस्थिती बदल- लेली नाही व ते पैसे सर्व आम्ह- ाला मिळाले असते तर आमच्या मुलांना चांगली शिक्षण राहण्यास घर ही परिस्थिती आमची बदलली असती याला जबाबदार फक्त यातील अन्वर शेख व्यक्ती जबाबदार आहेत पहिली व्यक्ती त्यांनी आमच्या गोर- गरीब मथुरांच्या जीवाशी खेळण्याचा प्रयत्न केलाय तो म्हणजे भोसे एॅग्रो प्रोडक्शन कंपनी सदस्य अन्वर शेख असल्याने त्यांची दहशत ज्यादा आहे हा आम्हाला न्याय मिळावा कठीण आहे आम्हाला कुठल्याही स्वरूपाचा रक्कम मिळणे अवघड वाटत आहे.

भोसे एॅग्रो प्रोडूसर कंपनीच्या कर्ज भरण्यासाठी परस्पर वापरलेले आ- हेत असे आम्हाला माहिती मिळाली ह्या प्रकरणावरून दबाव त्यासाठी हे कुठल्याही थराला जाऊ शकतात किंवा माझ्यावरती प्राण घातक हल्ला सुद्धा करू शकतात याची सर्वस्व जबाबदारी आदर कार्यावरती रा- हील वरील अर्जातील दोन व्यक्ती हे गुंड प्रवृत्तीच्या असून जातीने वकील असून ते कुठल्याही कलमाखाली आमच्यावर गुन्हा दाखल करून त्रास देऊ शकतात याची कसून चौकशी होऊन आम्हाला न्याय मिळावा द्यावा नाहीतर आम्हाला न्याय न मिळाल्यास आम्हाला आत्महत्या करण्याशिवाय कुठलाही पर्याय नाही.

अशी माहिती कृष्णात विष्णू बोंगे यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिले आहे.

# पटकथा लिहताना अधिकाधिक बारकावे महत्वाचे : कुमार दवे




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर,(प्रतिनिधी):- कोणत्याही चित्रपटासाठी स्क्रीप्ट लिहत असताना त्यातील बारकावे अधिक महत्वाचे असतात. असे प्रतिपादन लगान या हिंदी चित्रपटाचे पटकथाकार कुमार दवे यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा दक्षिण सोलापूरच्या वतीने आयोजित व्याख्यानामध्ये ते बोलत होते. लोकमान्य टिळक सभागृह चार हुतात्मा पुतळा चौक सोलापूर (ॲम्फी थिएटर ) येथे शुक्रवार दि. ३ एप्रिल रोजी झालेल्या या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात हे प्रमुख पाहुणे होते.

लेखनाचे अनेक प्रकार आ- हेत. कथा, कादंबरी, कविता, नाट्य कथा, यासह लेखना- चे प्रकार आहेत. नुसते हातात पेन घेतले म्हणजे लेखक होत नाही. मनातील विचार लोकांसम ोर मांडताना त्यातील बारकावे किती प्रमाणात आपण कागदावर उतरवतो आणि ते समोरच्या रसिक श्रोत्यां पर्यत अधिक सक्षमपणे पोहोचवतो त्यातच लेखकाचे कौशल्य अवलंबून आहे. चित्रपट यशस्वी करण्यासाठी सेन्सीटीव्ह, सेनसीब्लीटी आणि मनोरंजन या तीन प्रमुख गोष्टी आवश्यक आ- हेत. लगान या चित्रपटाची पटकथा लिहत असताना एक साधा विचार त्यातून बारकावे शोधून पटकथा तयार झाली. असेही कुमार दवे यांनी सांगितले.

मला दिग्दर्शक व्हायचे होते परंतु मी लेखक झालो. अजीज मिर्झा यांच्या प्रेरणेमुळे मी पटकथा लिहण्यास सुरूवात केली. मी रायटर पेक्षा क्राफ्ट यामध्ये अधिक रसिक आहे. असेही दवे यांनी सांगितले. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरकडून हा आगळ्या वेगळा कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल त्यांचे कौतुक आहे नेहमी असे कार्यक्रम आयोजित करावेत असी अपेक्षा आंतरराष्ट्रीय चित्रकार डॉ. सचिन खरात यांनी आपल्या भाषणातून सांगितले. मी चित्रकार आहे परंतु लगान हा चित्रपट मी अनेकवेळा पाहिला क्रिकेटच्या वेडापायी हा चित्रपट मी १० ते १२ वेळा पाहिला असेही खरात यांनी सांगितले.

प्रारंभी महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत त्यांनी माहिती दिली. या कार्यक्रमात जितेश कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय केला त्यानंतर चित्रकार सचिन खरात यांच्या हस्ते व्याख्याते कुमार दवे यांचा सत्कार करण्यात आला तर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे सचिन खरात यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष अमोल धाबळे यांनी केले तर आभार प्रकाश मोकाशे यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला अविनाश म हागांवकर, प्रसिध्दीप्रमुख विनायक होटकर, श्रीकांत येळेगांवकर, निवृत्त पोलीस उपअधिक्षक सुर्यकांत पाटील, प्राचार्य जी के देशमुख, सुधा इडलीचे सिध्देश्वर किणगी यांच्यासह मोठ्यासंख्येने रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती.

# पंढरपूर तालुक्यात भोसे येथे रात्रीत बसवला छत्रपती शिवाजी महाराजांचा यांचा पुतळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवल्यावर धनगर समाजा- ने मराठा समाज मध्ये वाद निर्माण झाला व तनावरचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर लोकप्रतिनिधींनी मध्यस्थी केल्यामुळे येथील वाद मिटला आहे. पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे छत्रपती शिवाजी म हाराजांचा पुतळा रात्रीत बसवण्यात आला आहे.

राष्ट्रपुरुषांचे पुतळे हे तरुण पिढीला आदर्श असल्यामुळे अनेक गावांमध्ये पुतळे बसवली जात आ- हेत मात्र पण काही समाजकंटक पुतळ्या आडून राजकारण करत असल्याची दिसून आले आहे. त्यामुळे गावामध्ये तणावाचे वा- तावरण निर्माण होऊन सर्वसामान्य जनतेला त्याचा त्रास होत आहे. पण शासनाने पुतळा बसवण्या अगोदर नियम अटी घालण्यात यावे अशी मागणी होऊ लागली आहे.

दोन दिवसांपूर्वी अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यात आला होता. यामध्ये दोन समाजामध्ये धनगर व मराठा समाजामध्ये मोठा वाद निर्माण झाला होता. त्यामुळे गावात तणावाचे वा- तावरण निर्माण झाले असल्यामुळे. मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अखेर लोकप्रतिनिधींनी मध्यस्थ केल्यामुळे तेथील वाद मिटला आहे. हे प्रकरण मिटले असतानाच पंढरपूर तालुक्यातील भोसे येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा रात्रीत बसवल्याची दिसून येत आहे.

मात्र येथे पुतळा बसवण्यास कोणत्याही प्रकारचा वाद नाही पण हा पुतळा बेकायदेशीरित्या बसवण्यात आला आहे. त्याम ुळे पोलीस प्रशासन व महसूल विभागाची डोकेदुखी वाढली आहे.



# दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले यांना दिल्ली येथे जर्नालिझम डॉक्टरेट अवार्ड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पनवेल,(केतन भोज) ;आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील सुपुत्र व नवी मुंबई पनवेल येथून दैनिक युवक आधारच्या माध्यम ातून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संतोष शिवदास आमले यांना थीश्रव उींर्श्रीीरश्र रपव एर्वीलरींळेपरश्र जीसरपळ- ीरींळेप तर्फे 'केींीरू ऊेलींीरींश ुरीव' या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा सन्मान मिळाल्याने परिसरात आनंदाचे व अभिमानाचे वाता- वरण निर्माण झाले आहे.

सदर संस्था भारत सरकार मान्यताप्राप्त असून,संस्थेच्या मूल्यांकन मंडळाने संचालक व अध्यक्ष यांच्या अधिकाराने हा सन्मान जाहीर केला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांचे निष्ठावान,धडाडीचे व समाजाभिम ुख कार्य लक्षात घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.आम ले यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत सामान्य जनतेच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने केले आहे.त्यांच्या लेखणी- ने समाजप्रबोधन घडवून आणत जनजागृतीची महत्त्वपूर्ण भूमिका बजा- वली आहे.'दैनिक युवक आधार'च्या माध्यमातून त्यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली असून,विविध व र्तमानपत्रां मध्ये उपसंपादक म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय काम पाहिले आहे. सध्या ते नवी मुंबई, पनवेल येथे वास्तव्यास असून 'दैनिक युवक आधार'चे सर्व कामकाज ते समर्थपणे सांभाळत आहेत.




त्यांच्या कार्यातून सामाजिक बांधिलकी,प्रामाणिकपणा आणि जनहिताचा ध्यास स्पष्टपणे दिसून येतो.पत्रकारितेला केवळ व्यवसाय न मानता समाज- सेवेचे प्रभावी साधन म्हणून त्यांनी जपले आहे.या सन्म ानामुळे अंभोरा गावासह आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून,विविध क्षेत्रातील मान्यवर,सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.संतोष आमले यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा मिळत असून, जिद्द,चिकाटी आणि प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर कोणतेही उद्दिष्ट साध्य करता येते,याचे हे उत्तम उदाहरण ठरत आहे.

**विविध पक्ष संघटनेची मागणी**

**उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांना दिले निवेदन**

# माळशिरस येथील तरुणी निलम गायकवाड हत्या प्रकरणातील नराधमाला फाशी द्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : माळशिरस येथील २१वर्षीय तरुणी निलम गायकवाड हिच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा, झाली पाहिजे अशी मागणी भोर उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र सिंह गौर यांच्याकडे विविध पक्ष संघटनेच्या वतीने लेखी निवेदन देऊन करण्यात आली,

यावेळी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, बहजन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अँड सुनिलतात्या धिवार, प्रहार संघटनेच्या नेत्या, सुरेखा ढवळे, परिवर्तन क्रांती संघटनेचे अध्यक्ष अमोल लोंढे, सामाजिक कार्यकर्ते आनंदराव घोरपडे गुरुजी, सुनिल जगताप, बहुजन हक परिषदेचे कैलास धिवार, बाळासाहेब ताठेले सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कसबे, भारतीय जनता




पक्षाचे नेते अमोल जगताप, पत्रकार छाया नांदगुडे, संदेश सोनवणे, अविनाश भोसले, केशव भोसले, माजी सरपंच सुरज औचरे, संजय भोसले, पत्रकार अजिम आतार, योगेश -भोसले आदी उपस्थित होते, उपविभागीय पोलीस

अधिकारी राजेंद्र सिंह गौर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मयत तरुणी हिची हत्या करणारा नराधम अनिकेत जाधव यांस फाशीची शिक्षा झाली पाहिजे यासाठी पोलीस प्रशासनाने या गुन्ह्याचा तपास निःपक्षपाती पणे करावा, तसेच आरोपीच्या वडिलांना या प्रकरणात सहआरोपी करावे मयत पीडीत तरुणी ही म ाळशिरस रहिवासी असून अनुसूचित जाती प्रवर्गातील आहे, ती शिक्षणासाठी सासवड येथे येते, तिला आरोपी अनिकेत विष्णु जाधव, रा माळशिरस ता पुरंदर जिल्हा पुणे याने

बळजबरीने खानवडी येथील सौर ऊर्जा प्रकल्प या अज्ञात स्थळी नेऊन, तिच्यावर अत्याचार करून तिचा खून करून, आर- ोपी जेजुरी पोलीस स्टेशन येथे हजर झाला आहे.

पीडीत मुलगी ही अनुसूचित जाती प्रवर्गातील आहे हे माहीत असूनही त्याने हे कृत्य केले आहे, सदर घटनेत त्याच्या वडीलाचाही संबंध असण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे, पोलीसांनी त्या अनुषंगाने तपास करावा अशी मागणी केली आहे, आरोपी व आरोपीच्या वडीलांची पार्श्वभूमी ही गुन्हेगारी स्वरुपाची असल्याने, व त्यांचा अवैद्य धंद्यांची संबंध असल्याने, गेल्या सहा महिन्यांत जेजुरी पोलीस स्टेशनचे कर्मचारी, तसेच उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी कर्मचारी यांचे मोबाईल कॉल, तपासण्यात यावेत व या गुन्ह्यात इतर कोणाचा सहभाग आहे का? काय याचा देखील तपास करण्यात यावा अशी मागणी बहुजन हक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष अँड सुनिलतात्या धिवार, प्रहार संघटनेच्या नेत्या सुरेखा ढवळे, परिवर्तन क्रांती संघटनेचे नेते अमोल लोंढे, कैलास घिवार, विष्णूदादा भोसले यांनी केली.

# आयएएस परीक्षेत वाढवली मुली शाळेचे घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जानेवारी २०२६ मध्ये राज्यस्तरीय खड परीक्षा झाली त्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भाळवणी मुली इयत्ता चौथी मधील मुलींनी भरघोस यश मिळवणे वर्गातील १४ मुली परीक्षेसाठी बसल्या होत्या. निकाल शंभर टक्के लागला असून गुणवत्ता यादी तब्बल तेरा विद्यार्थिनी आल्या.

कुमारी ज्योतिर्लिंगे २७४ गुण राज्यात बारावी, कुमारी रुंजी देटे कुमारी शिवन्या पिसे २७२ गुण दोघी जिल्ह्यात प्रथम, कुमारी अल्फिया मुजावर २६४ गुण जिल्ह्यात पाचवी, कुमारी राजकन्या कांबळे २६३ गुण जिल्ह्यात सहावी, कुमारी आरोही बोधे २५६ गुण जिल्ह्यात नववी, कुमारी प्राजक्ता लिंगे २५४ गुण जिल्ह्यात दहावी, कुमारी वेदश्री मेत्रे २५२ गुण जिल्ह्यात अकरावी, कुम ारी प्रणिती शिंदे २४४ गुण केंद्रात प्रथम, कुमारी अर्पिता शिंदे २४४ गुण केंद्रात प्रथम, कुमारी आनंदी कळ ढोणे २४४ गुण केंद्रात प्रथम, कुमारी प्राजक्ता कारंडे २२४ केंद्रात चौथी व कुमारी स्वरा शिंदे १९८ गुण मिळाले आहेत सर्व यशस्वी मुलींचे व मार्गदर्शक शिक्षक महानंदा साळुंखे यांचे ग्रामस्थ पालक शालेय व्यवस्थापन संस्था अध्यक्ष किशोर बरडकर उपाध्यक्ष अमोल शिंदे सर्व सदस्य विस्तार अधिकारी शारदा रासकर मुख्याध्यापक सु. ना. शिंदे यांनी अभिनंदन केले

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटींची विकास कामे होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; सिंहस्थ कुंभमेळा अविस्मरणीय करण्याची मुख्यमंत्र्यांची अखिल भारतीय संत समितीच्या बैठकीत ग्वाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक, : प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रियेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.






अखिल भारतीय संत समिती-राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदावारीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

तसेच कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. ही प्राचीन असण्यासोबतच नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूला सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे. या सोहळ्यात सर्व जाती-धर्माचे भाविक सहभागी होत असल्याने कुंभमेळा हा राष्ट्रीय एकात्मतेचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात केवळ पवित्र स्नान होत नाही, तर साधू - संतांचे मार्गदर्शन, विचारांचे आदान- प्रदान होत असल्याने पुढील वर्षी होणारा कुंभमेळा अविस्मरणीय होईल, असा विश्वास श्री.फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे समाजातील गैरप्रकारांना आळा बसेल तसेच भोंदूगिरी करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी अविचल देवाचार्य, जितेंद्रानंद स्वामी, रवींद्रपुरी महाराज, तुषार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार ड. राहुल ढिकले, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, माजी आमदार बाळासाहेब सानप, महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्यासह देशभरातून आलेले साधू, संत, महंत उपस्थित होते.

# ॲसिड हल्ला पीडितेस शासन सर्वतोपरी मदत करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी : संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील सिड हल्ल्यातील पीडित मुलीची महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी रविवारी लोणी येथील प्रवरा रुग्णालयात जाऊन भेट घेतली. या अत्यंत निंदनीय घटनेतील पीडित मुलीच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे आणि तिच्या पुढील उपचारांचा संपूर्ण खर्च शासन करेल, अशी ग्वाही कु. तटकरे यांनी दिली.



रुग्णालयात उपचार घेत असलेल्या या मुलीची प्रकृती सध्या स्थिर आहे. मात्र, तिचे वय लहान असून त्वचा संवेदनशील असल्याने तिला आणखी काही दिवस उपचारांची तसेच एका शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. डॉक्टर व प्रशासन तिची पूर्ण काळजी घेत आहेत. मुलीचे विशेष समुपदेशकाकडून समुपदेशन करण्यात आले असून, स्थानिक डॉक्टरांच्या मदतीने हे समुपदेशन पुढेही प्रभावीपणे सुरू ठेवण्याबाबत चर्चा झाली आहे.

**पीडित मुलीशी व तिच्या कुटुंबीयांशी महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी साधला संवाद**

पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे, या उपचारांचा कोणताही आर्थिक भार पीडितेच्या कुटुंबावर पडू दिला जाणार नाही. पीडितेस महिला व बालविकास विभागाच्या 'मनोधैर्य' योजनेअंतर्गत एक लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य तात्काळ देण्यात येईल. यासोबतच, न्याय विभागाच्या 'व्हिक्टिम कॉम्पेन्सेशन स्कीम २०२२' अंतर्गत तिच्या कुटुंबाला तातडीची मदत म्हणून ३ लाख रुपये आधीच देण्यात आले आहेत.

घटनेच्या दिवसापासूनच आपण पोलीस अधीक्षकांच्या संपर्कात असल्याचे सांगून मंत्री तटकरे म्हणाल्या, स्थानिक आमदारांनीही हा मुद्दा सभागृहात मांडला होता. सध्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांचा तपास वेगाने सुरू असून, विविध यंत्रणांची मदत घेतली जात आहे. कुटुंबाकडे काही अतिरिक्त माहिती असल्यास ती पोलिसांना द्यावी, तसेच त्यांच्या काही अपेक्षा असल्यास त्या सांगाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. या सांत्वनपर भेटीदरम्यान पीडित मुलीच्या कुटुंबातील तिची आई, मावशी व मामा उपस्थित होते. तसेच, आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय कदम हेही याप्रसंगी उपस्थित होते.

# जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने मधुमेह पीडीतांना लो गो शुगर फ्री पॅकेट्सचे विनामूल्य वाटप







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


डोंबिवली (प्रतिनिधी) : सध्या बऱ्याच नागरिकांना शुगरचा त्रास असतोच, तो शुगरचा त्रास कमी होण्यासाठी लो गो शुगर फ्री पॅकेट्सचा वापर केला जातो. चहा, कॉफी,सेरेलॅक, फ्रुट, केक, मिठाई, पुडिंग्ज अशा अनेक पदार्थांमध्ये साखरेला उत्तम पर्याय म्हणून वापरले जाते. यावेळी जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने डोंबिवली येथील एम आयडीसी निवासी भागातील सिद्धिविनायक मंदिरात तसेच सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील मधुमेह पीडीतांना लो गो शुगर फ्री पॅकेट्सचे विनामूल्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, खजिनदार दत्ता कडुलकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार-अरविंद सुर्वे, हिंद सेना फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश दाभोळकर, समाजसेवक बाळकृष्ण देसाई, मंगेश खोत हे उपस्थित होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ सल्लागार-अरविंद सुर्वे यांचे विशेष सहकार्य लाभले.या स्तुत्य उपक्रमाचे बऱ्याच नागरिकांनी कौतुक केले.




# अवकाळी पावसामुळे लोकशक्ती शुगर कारखान्याचे तब्बल पाच कोटींचे नुकसान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ३ एप्रिल २०२६ रोजी आलेल्या अवकाळी पाऊस व जोरदार वादळी वाऱ्यामुळे लोकशक्ती शुगर अँड अलाइड इंडस्ट्रीज लिमिटेड या साखर कारखान्याला मोठा फटका बसला असून अंदाजे पाच कोटी रुपयांच्या नुकसानीची प्राथमिक माहिती कारखाना व्यवस्थापनाने दिली आहे.



दुपारी साडेचारच्या सुमारास अचानक वेगवान वादळ उठले. या वादळाच्या जोरामुळे साखर गोडाऊनचे छत अक्षरशः उडून गेले. परिणामी गोडाऊनमध्ये साठवलेली साखर पावसात भिजून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वाऱ्याचा जोर इतका प्रचंड होता की कारखाना परिसरातील काही इमारतींवरील पत्रे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उडून गेली. ऑफिस विभाग तसेच लेबर कॉलनीतील अनेक घरांवरील पत्रेही उडाल्याचे व्यवस्थापनाने सांगितले.

वादळाचा फटका केवळ कारखाना परिसरापुरता मर्यादित न राहता आजूबाजूच्या द्राक्ष बागांनाही बसला असून शेतकऱ्यांचेही नुकसान झाल्याचे प्राथमिक चित्र आहे. विशेषतः शुगर गोडाऊनच्या छताचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान आणि त्यात साठवलेली भिजलेली साखर यामुळे कारखान्याला तब्बल पाच कोटी रुपयांचा फटका बसल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

या संपूर्ण घटनेची पाहणी करण्यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी तसेच शासकीय अधिकारी लवकरच कारखाना परिसराला भेट देणार असल्याची माहितीही व्यवस्थापनाकडून देण्यात आली आहे.

**गोव्यातील बाल युवा कीर्तनकारांच्या चक्री कीर्तनाने बहरले धर्मसंकीर्तन महोत्सवाचे दुसरे पुष्प**

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मधील धर्मसंकीर्तन महोत्सवात रंगली बालकीर्तनकारांची कीर्तन मैफील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : श्री.स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमीत्त येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान आयोजीत धर्मसंकीर्तन महोत्सवात गोवा येथील कीर्तनकार सुहास वझे यांच्या गोमंतक संत मंडळ संचलीत कीर्तन विद्यालयातील बाल युवा कीर्तनकारांची उत्कृष्ट कीर्तने स्वामी दरबारात संपन्न झाली. श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान मधील धर्मसंकीर्तन महोत्सवात बालकीर्तनकारांची कीर्तन मैफील रंगल्याने गोव्यातील बाल युवा कीर्तनकारांच्या चक्री कीर्तनाने धर्मसंकीर्तन महोत्सवाचे दुसरे पुष्प बहरले.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या १४८ व्या पुण्यतिथी उत्सव धर्मसंकीर्तन महोत्सवात आज दुसरे पुष्प बालयुवा कीर्तनकार ह.भ.प.कु.सना साटेलकर ह.भ.प. कु.श्रुती घोडके, ह.भ.प.कु. सावली गावकर, ह.भ.प.कु.श्रीया साळगावकर यांची एकाचवेळी कीर्तनं संपन्न झाली. या चक्री कीर्तन सेवेतून त्यांनी पुर्व रंगात आपल्या कीर्तनातुन नश्वर मनुष्य देहाच्या उन्नतीसाठी देवभक्ती, देशभक्ती, व गुरु भक्ती अंगी रुजविण्यासाठी आपल्या जीवनातील कांही वेळ द्यावा असे आवाहन केले. अनेक राष्ट्रपुरूष व समाज सुधारकांनी त्यांच्या जीवनातील जवळपास सर्वच वेळ समाजासाठी अर्पण केला, म्हणुन आज आपण सुखाचे क्षण अनुभवत आहोत, पण त्यात विकारी वृत्तीने धुमाकूळ घातला आहे. सोशल मिडीयाचा वापर चुकीच्या मार्गाने जास्त प्रमाणात होत असून याचा परिणाम समाजाच्या नुकसानीत आहे. समाज संघटीत झाला तर असे बिकट प्रसंग निर्माण होणार नाहीत. माणसात नराचा नारायण होण्याची क्षमता आहे त्यासाठी योग्य साधन आपणास पाहिजे हे साधन फक्त संत चरित्राचा आभ्यास व आचरणातुन मिळेल असे विवेचन केले. कीर्तन सेवेच्या उत्तर रंगात संत चरित्र समजून घेवून त्याचं आचरण झालं तर समाज प्रगतशील होईल असेही विचार त्यांनी अनेक समाज पुरुष व संतांची दाखले देवुन व्यक्त करीत वेगवेगळ्या देव, देश, धर्म, संस्कृती तसेच हिंदू संस्कार,



संताचे विचार, संत चरित्र, देश भक्तीचे विचार या चक्री कीर्तनात सांगितले. या कीर्तन सेवेत कीर्तनकार ह.भ.प.कु.सना साटेलकर ह.भ.प. कु.श्रुती घोडके, ह.भ.प.कु. सावली गावकर, ह.भ.प.कु. श्रीया साळगावकर यांना तबल्यावर उमेश नाईक, हार्मोनियमवर सुहास वझे, चिपळी साथ संदीप गावकर, दामोदर कामत यांनी साथ संगत केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ओंकार पाठक यांनी स्वागत व प्रास्ताविक केले तर मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी कीर्तनकार व सर्व मान्यवर कलाकारांचा श्री.स्वामी समर्थांचा प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. या प्रसंगी मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, प्रा.शिवशरण अचलेर, श्रीमुख जगदाळे, बाळासाहेब कुलकर्णी, अक्षय सरदेशमुख, अमर पाटील, रमेश शिंदे, श्रीशैल गवंडी, एम.बी.पाटील सर,

प्रसाद पाटील सर, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, सागर गोंडाळ, स्वामी लोणारी, काशिनाथ इंडे, रवि महिंद्रकर, गिरीश पवार, संतोष पराणे, संजय पवार, मोहन जाधव, तुषार मोरे, बाळासाहेब एकबोटे आदींसह अनेक पुरुष व महिला स्वामी भक्त उपस्थित होते.